महाराष्ट्र शासन

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

"वनवर्धन", ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

Office - 0231/2653632,
E-mail ID –
ccftkolhapur@mahaforest.gov.in
ccftkolhapur@gmail.com


ईमेलद्वारे

क्रमांक कक्ष-६/नोसेल/सातारा/MSEDCL/२५-२६/ 216
कोल्हापूर -४१६००३, दिनांक 28 /०४/२०२५.

प्रति,
उपवनसंरक्षक सातारा

**विषय :** Proposal for diversion of 0.3716 ha forest land for regularization of lease of Forest land (Before 1980) for use of 33 KV X 11 KV Sub Station & other amenities from survey no 52 A, Gut. No. 77/1 at village Kshetra Mahabaleshwar, Tal. - Mahabaleshwar Dist. Satara, to the MSEDCL Satara, under section 2 (ii) of Forest (Conservation) Act 1980.

**संदर्भ :**
१. अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडीलपत्र FLD-२०२४/प्रक्र.१७/फ-१० दिनांक १०.०९.२०२४
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र कक्ष-१७/नोडल /कोल्हापूर/आयडी-१५६०८०/१३९६/२०२४-२५ दिनांक १२.०९.२०२४.
३. उपवनसंरक्षक सातारा यांचेकडील पत्र अ/कक्ष-६/जमीन/२०२४-२५/९९६ दिनांक ८.११.२०२४
४. या कार्यालयाचे पत्र कक्ष-६/नोसेल/सातारा/२४-२५/२१९८, दिनांक २१.११.२०२४
५. उपवनसंरक्षक सातारा यांचेकडील पत्र अ/कक्ष-६/जमीन/२०२४-२५/११८८, दिनांक १८.१२.२०२४

विषयांकित प्रकरणी वरील संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये सदर प्रस्तावामध्ये १ ते ५ त्रुटी उपस्थित करण्यात आलेल्या आहेत. संदर्भ क्र.३ अन्वये आपलेकडून १ ते ५ त्रुटींची पूर्तता करून अहवाल आवश्यक दस्तऐवजासह या कार्यालयास सादर केलेला आहे. तथापि आपलेकडून सादर करण्यात आलेल्या अहवालातील मुद्दा क्र.५ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. प्रस्तावित ग.नं.५२ अ ही वनजमीन देवस्थान ट्रस्टची असल्याबाबत दावा दाखल केला आहे. प्रकरणी प्रकल्प यंत्रणेविरुध्द कोणताही दावा दाखल नाही. सदर न्यायालयीन प्रकरण Judicial Court, Wai, Satara या न्यायालयात सुरु होते, परंतु सदरचा दावा वनविभागाच्या विरोधात गेला असुन त्याबाबत सदर न्यायालयात उक्त आदेशाच्या अनुषंगाने अपील दाखल करण्यात आले आहे. सदरचे क्षेत्र सद्यस्थितीमध्ये वनविभागाच्या ताब्यात असल्याने प्रस्तावित वनक्षेत्राचे वळतीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणे उचित ठरेल.

तथापि सदर प्रकरणी Special Civil Suit No.04/2023 मध्ये दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वाई यांनी दिनांक २९.०८.२०२३ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत- “Defendant their agents, administrator, executors or anyone on their behalf shall hand over vacant possession of the suit properties to the plaintiff trust within two months from the date of decree ”

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वाई यांनी वरीलप्रमाणे आदेश पारित केले असताना सदर क्षेत्र वन (संरक्षण एव संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतेकरण करता येईल काय? याबाबत आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर करणेबाबत संदर्भ क्र.४ अन्वेय कळविले होते. संदर्भ क्र.५ अन्वये आपलेकडून प्रस्तावित ग.नं.५२ अ ही वनजमीन देवस्थान ट्रस्टची असल्याबाबत दावा दाखल केला आहे. प्रकरणी प्रकल्प यंत्रणेविरुध्द कोणताही दावा दाखल नाही. सदर न्यायालयीन प्रकरण Judicial Court, Wai, Satara या न्यायालयात सुरु होते, परंतु सदरचा दावा वनविभागाच्या विरोधात गेला असुन त्याबाबत सदर न्यायालयात उक्त आदेशाच्या अनुषंगाने अपील दाखल करण्यात आले आहे. सदरचे क्षेत्र सद्यस्थितीमध्ये वनविभागाच्या ताब्यात असल्याने प्रस्तावित वनक्षेत्राचे वळतीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणे उचित ठरेल असे मत सादर केले आहे.

तरी या पत्राद्वारे आपणास कळविण्यात येते की, वळतीकरण करावयाचे प्रस्तावित जमिनीबाबत सरू असलेले न्यायालयीन प्रकरणाची सविस्तर टिपणी (Chronology) या कार्यालयास सादर करावी. तसेच Judicial Court, Wai, Satara या न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने दाखल करण्यात आलेल्या अपीलाची प्रत या कार्यालयास सादर करावी.

(आर.एम. रामानुजम)
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),**
**कोल्हापूर.**

**प्रतिलिपी :** Additional Executive Engineer Civil, MSEDCL Ltd., Krishna Nagar, Satara यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.